MHRG070014522025

**<u>फौजदारी चौकशी अर्ज क्र.१३९/२०२५ मधील निशाणी क्र.१ वरील आदेश</u>**

सदर अर्ज भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, कलम ५०३ अन्वये अर्जदार श्रीमती. अक्षता अक्षय कुलकर्णी, राहणार – ०२, ओमसाई अपार्टमेंट, ब्राम्हीण आळी, शिवाजी मैदान,नेरळ, जि. रायगड पिन नं. ४१०२०१ यांचे सायबर क्राईम पोर्टल तक्रार क्र.३१९११२५०२२२३१२ मधील बँक ऑफ बडोदा, खाते क्र.३७८००१०००००२०५ मधील रक्कम रुपये २७,०००/–इतके गेले असून त्यातील अशी एकुण रक्कम रुपये २७,०००/(अक्षरी रक्कम सत्तावीस हजार रुपये मात्र) होल्ड करण्यात आलेली आहे. तरी होल्ड केलेली रक्कम परत मिळणेसाठी केलेला आहे.

०२. अर्जदाराचे असे कथन आहे की, अर्जदार यांना दिनांक २०/११/२०२५ रोजी कॉल आलाा की, तुमच्या पतीने तुमच्या अकाउंटवर पैसे पाठवायला सांगितले आहेत. तर तुमचा क्यु आर कोड पाठवा म्हणून अर्जदार यांनी सदर इसमाच्या सांगण्यावरुन त्यांचा क्यू आर कोड पाठवला. सदर इसमाने अर्जदार यांना जास्तीची रक्कम पाठविल्याचा मॅसेज पाठवला व अर्जदार यांना सांगितले की, तुम्हाला चुकून जास्त पैसे सेंड झाले आहे ते परत माझ्या अकाउंटला पाठवा म्हणून अर्जदार यांनी सदरचे पैसे सदर इसमाला पाठवले. नंतर अर्जदार यांनी त्यांचे अकाउंट चेक केले असता त्यांच्या लक्षात आले की, अर्जदार यांची ऑनलाईन फसवणूक

झालेली आहे. त्यानंतर अर्जदार यांनी नेरळ पोलीस स्टेशन येथे त्यांच्यासोबत सायबर गुन्हा घडल्याची तक्रार दाखल केली. फसवणुकी दरम्यान अर्जदार यांचे २७,०००/- इतकी रक्कम गेली असून त्यातील २७,०००/- इतकी रक्कम पोलीसांकडून गोठवण्यात आलेली आहे. सदरची गोठवण्यात आलेल्या खात्यातून रक्कम अर्जदार यांच्या बॅक ऑफ बडोदा, नेरळ शाखा, आकउंट नंबर ३७८००१०००००२०५ या खात्यावर परत करण्यात यावी. अर्जदार मा.न्यायालय सांगेल त्या अटी व शर्तीचा बॉड लिहून देण्यास तयार आहे. सबब, इतर योग्य व न्यायाचा आदेश अर्जदार यांचे लाभत व्हावेत, अशी विनंती केली आहे.

०३. सहा. सरकारी अभियोक्ता आणि तपासी अंमलदार, कर्जत पोलीस स्टेशन यांचे म्हणणे मागविले. सहा. सरकारी अभियोक्ता यांनी असे कथन केले आहे की, सदर प्रकरणामध्ये फिर्यादी यांची अपहारीत रक्कम ही गुन्ह्यांचे तपास कामी गोठविण्यात आलेली असून त्याबाबतचा पुरावा दाखल केला आहे. सदर गोठविण्यात आलेली रक्कम ही महत्वाचा पुरावा असून तो परत केल्यास खर्च होण्याची शक्यता आहे. सदरचा मुद्देमाल गुन्हा शाबीतीसाठी महत्वाचा असून तो मिळून न आल्यास गुन्हा शाबीतीवर परिणाम होईल सबब अर्जदार यांचा अर्ज नामंजूर करण्यात यावा, ही विनंती. तपासी अंमलदार, नेरळ यांनी असे कथन केले आहे की, सदर गुन्हातील पैसे रत्नाकर बँक लिमेडेट., खाते क्रं.४०९००२४८२९९७ वरती २६,०००/- इतके गोठविण्यात आलेले आहेत. अर्जदार यांची गोठविण्यात आलेली रक्कम ही योग्य त्या अटी व शर्थीवर परत देणेस त्यांची काही हरकत नाही. मा.न्यायालयात अर्ज दाखल केला असून सदर बाबत न्यायालयामार्फत योग्य तो आदेश होणेस विनंती आहे.

०४. मी दोन्ही बाजूंचा युक्तीवाद ऐकला. अर्जदार यांनी पोलीसांकडे केलेली तक्रारीची प्रत, अर्जदार यांच्या बॅक ऑफ बडोदा या बँकेचे बँक स्टेटमेंटची प्रत इत्यादी कागदपत्रे दाखल केलेली आहेत.

०५. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**<u>आदेश</u>**

| | |
|---|---|
| १. | अर्ज मंजूर करण्यात येतो. |
| २. | सायबर क्राईम पोर्टल तक्रार क्र.३१९११२५०२२२३१२ मधील बॅक ऑफ बडोदा, या खात्यातुन वळती झालेली एकुण रक्कम रुपये २७,०००/- (अक्षरी रक्कम सत्तावीस हजार रुपये मात्र) ही रक्कम अर्जदार श्रीमती. अक्षता अक्षय कुलकर्णी, यांना रक्कम रुपये २७,००० (अक्षरी रक्कम सत्तावीस हजार रुपये मात्र) रुपयांच्या क्षतीपुर्ती बंधपत्रावर अंतरिम स्वरुपात द्यावी. सदरची रक्कम अर्जदार यांच्या वर नमुद बँक खात्यात वर्ग करण्यात यावी. |
| ३. | जप्त रक्कम ही अर्जदाराची नसल्याचे निष्पन्न झाल्यास अर्जदार यांनी सदरची रक्कम परत करावी. |
| ४. | अर्जदाराने सदर रक्कम ही निर्देशित तारखेस न्यायालयात हजर ठेवावी. |
| ५. | सदर आदेशाची प्रत नेरळ पोलीस स्टेशन व सायबर क्राईम विभाग यांच्याकडे माहितीसाठी व पुढील कार्यवाहीसाठी पाठविण्यात यावी. |

Sd/-

कर्जत. (श्रीमती ए. एस. वाडकर)

दिनांक : १०/०३/२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कर्जत.

जि. रायगड